कार्यकारी अधिकारी श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
यांचे कार्यालय पंढरपूर जिल्हा सोलापूर.
(महाराष्ट्र शासन स्थापित)

कार्यालय (पिन कोड नं. ४१३३०४)
दुरध्वनी क्रमांक ०२१८६ २२४४६६/२२३५५० इमेल. eotemple@gmail.com

---

जा.क्र. श्री.वि.रू.मं.स.पं. क्र.जमीन/कावि ३५४/१/२०१६ दि. १० /०५/२०१६

पत्र

प्रति,
गाव कामगार तलाठी
मौजे – वडाळा
तालुका – उत्तर सोलापूर मे. तहसिलदार उत्तर सोलापूर यांचे मार्फत रवाना.
जिल्हा – सोलापूर

विषय – कार्यकारी अधिकारी श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावावरील मौजे वडाळा तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर येथील जमीन गट नं. २५३ क्षेत्र हे. ६.८१ आर पो.ख. हे. ०.०७ आर, ११ महिने कराराने पटटयाने देण्याचे जाहीर प्रसिध्दीकरण करणेबाबत...

विषयांकीत जमीन वार्षिक भाडे पटटयाने देणेबाबत यासोबत जाहिर निवेदन प्रसिध्दीसाठी पाठविले आहे. ते आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर व गावी दवंडीने दिनांक १६/०५/२०१६ पुर्वी प्रसिध्द करावे व दोन्ही स्वरूपातील प्रसिध्दीचा रिपोर्ट त्याच दिवशी डाकेने व इमेलव्दारे वरील इमेल वर पाठवावा. सोबत जाहिर निवेदनाच्या तीन प्रती व अर्जाचा नमूना पाच प्रतीत पाठविण्यात आला आहे. यापुर्वी दिनांक २२/०३/२०१६ च्या पत्राने जाहिर प्रसिध्दीकरणाबाबत आपणाकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला होता. परंतू, त्यास योग्य स्वरूपात प्रसिध्दी दिली गेली नसल्याचे व प्रसिध्दीबाबत आपला प्रसिध्दीचा अहवाल इकडे प्राप्त झालेला नसल्यामुळे पुन्हा एकदा असे प्रसिध्दीकरण करण्याची वेळ आलेली आहे. यापुढे असा प्रसंग उद्‌भवू नये याची दक्षता घ्यावी.

उप जिल्हाधिकारी तथा कार्यकारी अधिकारी
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

प्रत – मे. तहसिलदार– उत्तर सोलापूर जिल्हा – सोलापूर यांना

२/– सोबतचे प्रसिध्दीकरण आपले कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दि. १६/०५/२०१६ पूर्वी प्रसिध्द करून प्रसिध्दीकरणाचा अहवाल इकडे त्वरीत डाकेने व इमेलव्दारे सादर करावा. तसेच संबधित तलाठी यांना सोबत जोडलेली प्रत पुढील कार्यवाहीसाठी आपणा मार्फत दिनांकीत स्वाक्षरी घेवून बजवावे व त्यांचेकडून मुदतीत प्रसिध्दीचा अहवाल आपणाकडे प्राप्त करून घेवून त्यांचा व आपला प्रसिध्दीचा अहवाल निविदा मागणी केलेल्या तारखे पुर्वी इकडे कमीतकमी ७ दिवस आधी मिळेल अशा रितीने पाठवावा ही विनंती आहे. यापुर्वी पाठविलेल्या प्रसिध्दीकरणा संदर्भात आपणाकडून प्रसिध्दीचा अहवाल प्राप्त झालेला नाही. ही बाब योग्य नाही. तेंव्हा प्रसिध्दीकरणाच्या कामी आपण स्वत: लक्ष घालून दिलेल्या मुदतीत अहवाल पाठविला जाईल याची दक्षता घ्यावी.

२) मा. उप विभागीय अधिकारी सोलापूर विभाग क्रमांक १ यांना सोबतचे जाहिर निवेदन त्यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करून त्याबाबतच्या प्रसिध्दीचा अहवाल सत्वर इकडे पाठवून देण्यास व संबधित तहसिलदार व तलाठी यांचेकडून प्रसिध्दीचा अहवाल मुदतीत सादर केला जाईल याकामी लक्ष देण्यास विनंती आहे.

३) मा. जिल्हाधिकारी सोलापूर (हूजूर रेकॉर्डकिपर) यांना आपले कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर सोबतचे जाहिर निवेदन प्रसिध्द करून त्याबाबतच्या प्रसिध्दीचा अहवाल इकडे पाठवावा अशी नम्र विनंती आहे.

उप जिल्हाधिकारी तथा कार्यकारी अधिकारी
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर

कार्यकारी अधिकारी श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
याचे कार्यालय पंढरपूर जिल्हा सोलापूर.–४१३३०४
(महाराष्ट्र शासन स्थापित)
दुरध्वनी कं. ०२१८६ २२४४६६/२२३५५० ईमेल:eotemple@gmail.com

जा.क्र. श्री.वि.रू.मं.स.पं./जमीन/का.वि. ३५४/२/२०१६ दिनांकः /०५/२०१६

## जाहिर निवेदन

प्रति,
समस्त ग्रामस्थ
मौजे – वडाळा
तालुका – उत्तर सोलापूर
जिल्हा –सोलापूर

विषयः– श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे मालकिच्या मौजे – वडाळा ता. – उत्तर सोलापूर जिल्हा – सोंलापूर येथील जमीनी पट्ट्याने देणेबाबत

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे मालकीच्या खालील जमीनी त्यापुढे नमुद केलेल्या किमान वार्षीक पट्टयाचे रक्कमेपेक्षा जास्त रक्कम देणाऱ्या व्यक्तींना ११ महिने मुदतीसाठी ( १ जुन २०१६ ते ३० एप्रिल २०१७ ) भाडे पट्टयाने दयावयाच्या आहेत. जमीनीचा तपशिल

| अ क्र. | गावाचे नांव,तालुका व जिल्हा | गट नंबर | क्षेत्र हे. आर | वार्षीक भाडे पट्टयाची किमान रक्कम (रूपये) |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे वडाळा ता. उत्तर सोलापूर जिल्हा – सोलापूर | २५३ | ६.८१ चा ०.०७ | १,०८,०००/– |

तरी या बाबतच्या खालील अटीस अनुसरून सदर जमीन वरील कालावधीसाठी भाडे पट्टयाने फक्त शेतीसाठी वहिवाटण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीनी सोबतच्या नमुन्यात लेखी अर्ज त्यात नमुद पुराव्याच्या कागदपत्रासह व वरनमूद रकमेच्या १/४ रक्कमेच्या

म्हणजे २७०००/— च्या अनामत रकमेच्या डिमांड ड्राप्टसह सिलबंद पाकिटात दि. २३/०५/२०१६ पर्यंत या कार्यालयाकडे रजि.पोष्टाने किंवा समक्ष सादर करावेत.

जमीन पट्टयाने वहिवाटीस देण्याच्या अटी खालील प्रमाणे आहेत.

१) वरील जमीन ही पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ चे कलम ३५ पोट कलम (२) (ख) च्या तरतुदीनुसार फक्त १ जुन २०१६ ते ३०एप्रिल २०१७ या कालावधीसाठीच भाडेपट्टयाने देण्यात येईल.

२) वर नमुद केलेप्रमाणे किमान वार्षिक पट्टयाच्या रक्कमेपेक्षा जास्तीतजास्त पट्टयाची रक्कम देणाऱ्या त्या गावातील किंवा लगतच्या गावातील व्यक्तीस जमीन भाडे पट्टयाने देण्यात येईल.

३) सदरचा वार्षिक भाडेपट्टा वर नमुद केल्याप्रमाणे वरील कालावधीसाठीच असल्यामुळे भाडेपट्टा घेणाऱ्या व्यक्तीने सदर शेतजमिनीच्या वहिवाटी बाबतची ठरलेली भाडे पट्टयाची रक्कम अर्जा सोबत जमा केलेल्या डी.डी. व्दारे भरलेली रक्कम रू. २७०००/— ची रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम **निविदा मंजूर झालेल्या तारखेपासून ७ दिवसात** मंदिर समिती पंढरपूर कडे रोख अथवा डिमांड ड्राफ्टने भरण्याची आहे. त्यानंतरच भाडे पट्टेदाराला जमा रकमेची पावती देण्यात येईल सदर पावती मिळाल्यानंतरच संबंधित भाडे पट्टेदाराला जमीन कसण्याचा अधिकार प्राप्त होईल. उर्वरीत रक्कम वरील मुदतीत न भरल्यास वरील भरलेली अनामत रक्कम परत मिळणार नाही.

४) जमीनीत इकडील परवानगी शिवाय कोणतीही मोठी सुधारणा करता येणार नाही. तसेच अनाधिकृत अतिक्रमण करता येणार नाही.

५) जमीनीत घ्यावयाच्या पिकासाठी व त्याबाबतच्या मेहनत मशागतीसाठी इकडून कोणताही मोबदला मागता येणार नाही.

६) जमीनी बाबतचा शेतसारा, शिक्षणकर, रोजगार हमी कर व वाढीव शिक्षणकर तसेच कॅनाल उपलब्ध असल्यास त्याची पाणी पट्टी, तसेच विद्युत पंप असल्यास त्याचे विद्युत बिल मंदिर समितीच्या वतिने मे.कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नांवे भरण्याची जबाबदारी पट्टेदाराची राहील. व त्या प्रमाणे बिल अदा केल्याच्या अस्सल पावत्या ज्या त्या वर्षी इकडे जमा करणे बंधनकारक राहील.

७) पट्टयाने दिलेल्या जमीनी या पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ मधील तरतुदीनुसार श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांनी धारण केलेली मिळकत असल्याने व ती देवस्थान जमीन असल्याने त्याबाबत म.ज.म. अधिनियम १९६६ व मुंबई कुळ कायदा व शे.ज. न्या. अधि. १९४८ मधील तरतुदीनुसार कोणत्याही सक्षम न्यायालयाकडे दाद मागता येणार नाही. तसेच सध्या व त्यात्या वेळी असलेल्या प्रचलित कायदयाचा कोणताही आधार घेऊन मंदिर समितीवर कोणतीही व कसलीही दाद मागता येणार नाही.

८) समितीच्या या जमीनीच्या क्षेत्रावर कोणताही बिनशेती वापर व कोणतेही बांधकाम करता येणार नाही. बांधकाम केल्यास भाडेपट्टा रद्द करणेत येईल.

९) जमीनीच्या बांधावरील फळ झांडापासून मिळणाऱ्या उत्पन्नातील १/२ हिस्सा मंदिराकडे जमा करणे बंधनकारक राहील. शिवाय सदर क्षेत्रातील कोणत्याही झाडांची तोड करता येणार नाही. वटलेले झाड असल्यास त्याची माहिती ,इकडे देवून रितसर परवानगी घेवून त्याची विल्हेवाट लावता येईल.

१०) पट्टेदाराने वरील शर्तीचा भंग केल्यास सदरचा भाडेपट्टा मुदती आगोदर सुध्दा रद्द करण्याचा मंदिर समितीस हक्क राहणार आहे. त्यामुळे पट्टेदाराचे काही नुकसान झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी मंदिर समितीवर राहणार नाही.

११) नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे पिकाचे नुकसान झाल्यास त्याबाबत पट्टेधारकास इकडे कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मंदिर समितीकडे मागता येणार नाही.

१२) पट्टेदाराकडून उपरोक्त नमूद कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास कोणत्याही वेळी भाडेपट्टा रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाला राहील. पट्टा रद्द झाल्यास शेंतातील उभ्या पिकांचे उत्पादन मंदिर समितीच्या मालकीचे होईल.

१३) वरील अटींची पुर्तता केली आहे याची खात्री झाल्यानंतरच जमीन पट्टयाने दिल्याचा आदेश दिला जाईल. अर्जदार यांना सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र भाडेपट्टा मंजुर झालेनंतर करून द्यावे लागेल. उशीरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. सर्वात जास्त भाडे पटटयाची रक्कम नमूद असलेला अर्ज मंजूर झालेनंतर उर्वरीत अर्जदारांचे डी.डी. आपोआप रद्द ठरविले जातील.

उप जिल्हाधिकारी तथा कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर

अर्जाचा नमूना

दिनांक / /२०१६

अर्जदाराचे नाव: ______________________________

पुर्ण पत्ता ______________________________

मोबाईल क्र. ______________________________

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर जि.सोलापूर

विषय :— श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे मालकीच्या मौजे — वडाळा ता. — उत्तर सोलापूर जिल्हा — सोंलापूर येथील जमीनी भाडे पट्टयाने मिळणेबाबत...

संदर्भ :— आपले कडिल जाहीर निवेदन क्र. श्री.वि.रू.मं.स.पं.जमीन/कावि/३५४/२/१६ दिनांक /०५/२०१६

महोदय,

आपले कडिल संदर्भीय जाहीर निवेदनाला अनुसरून विषयात व खालील नमुद केलेली जमीन त्यापुढे नमुद केलेल्या वार्षीक भाडेपट्टयाच्या रक्कमेला दिनांक ०१/०६/२०१६ ते ३०/०४/२०१७ या कालावधी साठी भाडेपट्टयाने शेती करणेसाठी घेण्यास मी इच्छुक आहे.

| अ क्र. | गावाचे नांव, तालुका व जिल्हा | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | वार्षीक भाडे पट्टयाची मंदिर समितीने ठरवलेली किमान रक्कम (रूपये) | अर्जदाराने नमुद करावयाची भाडे पट्टयाची जास्तीतजास्त रक्कम (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौ वडाळा ता. उत्तर सोलापूर जिल्हा — सोलापूर | २५३ | ६.८१ चा ०.०७ | १,०८,०००/— | |

सदर बाबतीत जाहीर निवेदनामध्ये नमुद करण्यात आलेल्या खालील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

१) वरील जमीन ही पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ चे कलम ३५ पोट कलम (२) (ख) च्या तरतुदीनुसार ०१ जुन २०१६ ते ३० एप्रिल २०१७ या कालावधीसाठीच भाडेपट्टयाने देण्यात येईल.

२) श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीने नमुद केलेल्या किमान वार्षिक भाडे पट्टयाच्या रक्कमेपेक्षा जास्तीतजास्त पट्टयाची रक्कम देणाऱ्या व्यक्तीस जमीन पट्टयाने देण्यात येईल.

३) सदरचा वार्षिक भाडेपट्टा वर नमुद केल्याप्रमाणे वरील कालावधीसाठीच असल्यामुळे भाडेपट्टा घेणाऱ्या व्यक्तीने सदर शेतजमिनीच्या वहिवाटी बाबतची ठरलेली भाडे पट्टयाची रक्कम अर्जा सोबत जमा केलेल्या डी.डी. व्दारे भरलेली रक्कम रू. २७०००/– ची रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम निविदा मंजूर झालेल्या तारखेपासून ७ दिवसात मंदिर समिती पंढरपूर कडे रोख अथवा डिमांड ड्राफ्टने भरण्याची आहे. त्यानंतरच भाडे पट्टेदाराला जमा रकमेची पावती देण्यात येईल सदर पावती मिळाल्यानंतरच संबंधित भाडे पट्टेदाराला जमीन कसण्याचा अधिकार प्राप्त होईल. उर्वरीत रक्कम वरील मुदतीत न भरल्यास वरील भरलेली अनामत रक्कम मला परत मिळणार नाही हे मला मान्य आहे.

४) जमीनीत इकडील परवानगी शिवाय कोणतीही मोठी सुधारणा करता येणार नाही. तसेच अनाधिकृत अतिक्रमण करता येणार नाही.

५) जमीनीत घ्यावयाच्या पिकासाठी व त्याबाबतच्या मेहनत मशागतीसाठी इकडून कोणताही मोबदला मागता येणार नाही.

६) जमीनी बाबतचा शेतसारा, शिक्षणकर, रोजगार हमी कर व वाढीव शिक्षणकर तसेच कॅनाल उपलब्ध असल्यास त्याची पाणी पट्टी, तसेच विद्युत पंप असल्यास त्याचे विद्युत बिल मंदिर समितीच्या वतिने मे.कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नांवे भरण्याची जबाबदारी पट्टेदाराची राहील. व त्या प्रमाणे बिल अदा केल्याच्या अस्सल पावत्या ज्या त्या वर्षी इकडे जमा करणे बंधनकारक राहील.

७) पट्टयाने दिलेल्या जमीनी या पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ मधील तरतुदीनुसार श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांनी धारण केलेली मिळकत असल्याने व ती देवस्थान जमीन असल्याने त्याबाबत म.ज.म. अधिनियम १९६६ व मुंबई कुळ कायदा व शे.ज. न्या. अधि. १९४८ मधील तरतुदीनुसार कोणत्याही सक्षम न्यायालयाकडे दाद मागता येणार नाही, तसेच सध्या व त्यात्या वेळी असलेल्या प्रचलित कायदयाचा कोणताही आधार घेऊन मंदिर समितीवर कोणतीही व कसलीही दाद मागता येणार नाही.

८) समितीच्या या जमीनीच्या या क्षेत्रावर कोणताही बिनशेती वापर आणि कोणतेही बांधकाम करता येणार नाही. बांधकाम केल्यास भाडेपट्टा रद्द करणेत येईल.

९) जमीनीच्या बांधावरील फळ झांडापासून मिळणाऱ्या उत्पन्नातील १/२ हिस्सा मंदिराकडे जमा करणे बंधनकारक राहील. शिवाय सदर क्षेत्रातील कोणत्याही झाडांची तोड करता येणार नाही.

वटलेले झाड असल्यास त्याची माहिती मंदिर समितीला देवून रितसर परवानगी घेवून त्याची विल्हेवाट लावता येईल.

१०) पट्टेदाराने वरील शर्तीचा भंग केल्यास सदरचा भाडेपट्टा मुदती आगोदर सुध्दा रद्द करण्याचा मंदिर समितीस हक्क राहणार आहे. त्यामुळे पट्टेदाराचे काही नुकसान झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी मंदिर समितीवर राहणार नाही.

११) नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे पिकाचे नुकसान झाल्यास त्याबाबत पट्टेधारकास इकडे कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मंदिर समितीकडे मागता येणार नाही.

१२) पट्टेदाराकडून उपरोक्त नमूद कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास कोणत्याही वेळी भाडेपट्टा रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाला राहील. पट्टा रद्द झाल्यास शेतातील उभ्या पिकांचे उत्पादन मंदिर समितीच्या मालकीचे होईल.

१३) वरील अटींची पुर्तता केली आहे याची खात्री झाल्यानंतरच जमीन पट्टयाने दिल्याचा आदेश दिला जाईल.

२/– माझ्या ओळखीच्या व रहीवाशी पुराव्यासाठी मी खालील कागदपत्राच्या सत्यप्रती सोबत सादर केल्या आहेत. तसेच आपण नमूद केलेल्या रकमेच्या १/४ रक्कम रू २७०००/– ( अक्षरी रू – सत्तावीस हजार मात्र.) चा दिनांक / /२०१६ रोजीचा ————————— या बॅकेंचा डी. डी. क्रमांक सोबत सादर केला आहे. आधार कार्ड / निवडणूक ओळखपत्र / राष्ट्रीयकृत बॅकेचे पासबुक / ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी एकाची सत्यप्रत, रेशनकार्ड, स्वत:चे नावाचे लाईट बिल किंवा फोन बिल याची सत्यप्रत

तरी मी विनंती करतो कि, वर नमुद केलेली जमीन /जमीनी मला पट्टयाने मिळावी. ही विनंती.

आपला विश्वासू,